# परिपत्रक क्र. ११ / २०२१

विषय : दिनांक ३० जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस ''हुतात्मा दिन'' म्हणून पाळण्याबाबत.

संदर्भ : शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. जपुती २२२१/प्र.क्र.९/२९,दिनांक २८ जानेवारी,२०२१.

या न्यायालयातील सर्व न्यायिक अधिकारी, विधीज्ञ संघटना आणि या न्यायालयाच्या सर्व कर्मचा—यांना कळविण्यात येते की, देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्याअनुषंगाने, शासनाने दिनांक २८ जानेवारी, २०२१ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये, यावर्षीही शनिवार, दिनांक ३० जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत.

तरी, या न्यायालयातील सर्व न्यायिक अधिकारी, विधीज्ञ संघटना आणि या न्यायालयाच्या सर्व कर्मचा—यांना सुचित करण्यात येत आहे की, दिनांक ३० जानेवारी २०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० ते ११.०२ पर्यत दोन मिनिटांसाठी हुतात्म्यांना गंभीरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता) पाळून आदरांजली देण्यात येईल.

लघुवाद न्यायालय )
) ( सं. चं. मोरे )
मुंबई : २९ जानेवारी, २०२१ ) मुख्य न्यायाधीश

/home/registrar/Registrar_NWSawant/Registrar-Sawant-2021/Circular-Order 2021.odt